मा. उच्च न्यायालय, मुंबई जनहित याचिका क्र. 176/ 2012 संदर्भात मा. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचे अध्यक्षतेखाली दि. 17/05/2019 रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त

करमणूक शुल्क शाखा

---

जनहित याचिका क्र. 176/ 2012 संदर्भात आढावा घेणेसाठी मा. विभागीय आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली दि. 17/05/2019 रोजी दुपारी 12.00 वाजता समिती कक्ष, विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक येथे बैठक घेण्यात आली. बैठकीस खालील अधिकारी उपस्थित होते.

1) श्री. ज्ञानेश्वर खिलारी, उपआयुक्त ( पुनर्वसन ) नाशिक.
2) श्री. अशोक नखाते, ACP, Traffic, नाशिक प्रतिनिधी पोलीस आयुक्त शहर
3) श्री. एस. पी. वाणी, अधीक्षक अभियंता व प्रशासन (CADA), नाशिक.
4) श्री. ,एम.एम. भुसारे, सहाय्यक अभियंता, प्रतिनिधी, कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC), नाशिक
5) श्री.शिवकुमार वंजारी, कार्यकारी अभियंता, मनपा, नाशिक.
6) श्री. आर.आर. गोसावी, संचालक, नाशिक.
7) श्री. पी.एम. जोशी, R.O.MPCB नाशिक .
8) श्री. ए.एम.कारे, (SRO MPCB) नाशिक.
9) श्री.डी.बी. वसावे, F.O. MPCB, नाशिक.
10) श्री. हरिष महाजन, F.O. MPCB, नाशिक.
11) श्री. टेकाळे देविदास, DAO. Disaster Administrative officer, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक.
12) श्री. ठाकूर संदेश, MPCB
13) श्री. राजेश पंडीत व श्री. निशिकांत पगारे, याचिका कर्ता

सर्वप्रथम उपआयुक्त (करमणूक शुल्क) यांनी बैठकीस उपस्थित सर्व अधिका-यांचे स्वागत केले.

मा. उच्च न्यायालयाची याचिका क्र. 176/ 2012 चे डिसेंबर 2018 चे आदेशानुसार समितीमध्ये संबंधित सर्व विभागाच्या अधिका-यांचा निमंत्रित म्हणून समावेश करण्यात आला होता. तदअनुषंगाने दि. 15/01/2019 रोजी मा. विभागीय आयुक्त, नाशिक यांचे अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीचे इतिवृत्त सर्व संबंधितांना पाठविण्यात आले होते. सदर बैठकीत दिलेल्या सुचनांप्रमाणे सर्व संबंधित अधिकारी यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई व मा. विभागीय आयुक्त यांनी केलेल्या कार्यवाही बाबत खालीलप्रमाणे आढावा घेण्यात येवून सर्व संबंधित विभाग प्रमुखांना सूचना देण्यात आल्या.

1) गोदावरी प्रदुषण नियंत्रणाचे काम ज्या कार्यालयाशी संबंधित आहे त्या अधिका-यांचा गोदावरी संवर्धनाचे काम प्रभावी रित्या होण्यासाठी उपसमित्या स्थापन करुन या उपसमित्यांच्या बैठक घेण्यात यावी व झालेल्या बैठकीचे इतिवृत्त विभागीय आयुक्त कार्यालयास सादर करावे अशा सूचना मागील बैठकीत देण्यात आल्या होत्या. परंतु काही विभागांचे इतिवृत्त अद्यापही प्राप्त झाले नाही. मनपा व महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ (MPCB) या दोन उपसमित्यांच्या बैठका झाल्या असून उर्वरित उपसमित्यांनी बैठक घेणे बाकी आहे.

तरी मा. उच्च न्यायालयाच्या सुचनांप्रमाणे सर्व संबंधित विभागांच्या उपसमितीची दर दोन महिन्याला बैठक घेवून बैठकीचे इतिवृत मा. उच्च न्यायालयास सादर करणेकामी या कार्यालयास तात्काळ सादर करावेत.

2) गोदावरी प्रदुषण नियंत्रणाचे अनुषंगाने विविध विभागाकडून करण्यात येत असलेल्या कामांचा आढावा घेण्यात आला.

**अ) नाशिक महानगरपालिका :-** श्री. वंजारी, कार्यकारी अभियंता, महानगरपालिका, नाशिक यांनी सांगितले की, गंगापूर STP चे काम पूर्ण झाले असून ही STP जून मध्ये कार्यान्वित होईल. या STP मध्ये गंगापूर, आनंदवल्ली व वरच्या भागाचे सांडपाण्याचा समावेश होईल. या पाईपलॉईनची दररोज 18 MLT सांडपाणी वाहून वाहून नेण्याची क्षमता आहे. तसेच दुसरी पाईपलाईन पिंपळगांव खांब, तपोवन व खालच्या भागातील सांडपाणी वाहून नेण्यासाठी असून त्याची प्रतिदिन क्षमता 130 MLT आहे. तिसरी पाईपलाईन आगर टाकळी भागातील सांडपाणी वाहून नेण्यासाठी असून त्याची प्रतिदिन क्षमता 110 MLT आहे. पिंपळगांव खांब येथील ताब्यात असलेल्या जागेवर STP चे प्राथमिक काम सुरु करण्यात आले आहे. यावर नाशिक शहरातील गोदावरी प्रदुषण रोखण्यासाठी गटार / सांडपाणी / प्रदुषित पाणी वाहून नेण्यासाठी वरील तीन विभाग वगळून जो विभाग शिल्लक आहे त्या विभागासाठी सर्व सर्वेक्षण करुन नवीन पाईपलाईन टाकण्यासाठी आराखडा तयार करण्यात आला आहे, त्याची अंमलबजावणी करण्याचे नियोजन करण्याच्या सुचना मा. विभागीय आयुक्तांनी सर्व संबंधित अधिका-यांना दिल्या.

गोदावरी नदी पात्रातील तात्पुरती व इतर अतिक्रमणे कायद्यानुसार काढणे आवश्यक आहे. लेंडी नाला व चोपडा लॉन्स येथील मलनित्सारण / सांडपाणी नदी पात्रात जाऊ नये म्हणून मनपाने आवश्यक ती कार्यवाही तातडीने करावी. हे दोन्ही कामे प्रगती पथावर असून एक

महिन्यात पूर्ण होतील असे बैठकीत महानगर पालिका अधिका-यांनी सांगितले. गोदावरी नदीच्या पुलावर बसविण्याची कार्यवाही तात्काळ करण्याच्या सुचना देण्यात आल्या.

गोदावरी प्रदुषण नियंत्रणासाठी NMC CONNECT ॲपवर व संकेतस्थळावर येणा-या तक्रारी / सूचना / माहिती साठी मनपा कार्यालयात स्वतंत्रा कक्ष स्थापन करण्यात आल्याचे मनपातील अधिका-यांनी सांगितले. जाहिरातीचे नदीपात्रातील पोल काढून टाकणे बाबत समाधान व्यक्त करण्यात आले.

**ब) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC):-** 1) सातपूर व अंबड औद्योगिक क्षेत्रात रासायनिक पदार्थांवर प्रक्रिया करण्यासाठीचे यंत्रणाच्या उभारणीची कार्यवाही तसेच औक्षेगिक क्षेत्रातील सर्व कारखान्यातून निर्माण होणा-या व नदीचे प्रदुषण करणा-या Sewage वर कार्यवाही मनपाने करावी की MIDC ने करावी याबाबत बैठकीत चर्चा करण्यात आली. सदरच्या चर्चेदरम्यान Sewage वर MIDC ने कार्यवाही करणेसंबंधि आराखडा तयार करावा. तसेच दोषी कंपन्यावर तातडीने कार्यवाही करावी अशा सूचना मा. विभागीय आयुक्तांनी दिल्या.

औद्योगिक क्षेत्रातील CEPT यंत्रणा उभारणीसाठी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण महामंडळाने मान्यता दिलेली होती. CEPT संस्थेने बांधकामासाठी 1 वर्षापासून निविदा प्रसिध्द केली. परंतु निविदेस प्रतिसाद न मिळाल्यामुळे पुन्हा फेर निविदा काढण्यात येणार असल्याचे बैठकीत सांगण्यात आले. सदर कार्यवाही दोन महिन्यात पुर्ण करण्याचा सुचना देण्यात आल्या.

**क) उपजिल्हाधिकारी भूसंपादन :-** सदर कार्यवाही उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) यांनी पिंपळगांव खांब येथील STP चे लागा संपादनासाठी लवकर कार्यवाही पूर्ण करावी अशा सूचना देण्यात आल्या.

**ड) प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ :-** गोदावरी प्रदुषणाबाबत प्राप्त तक्रारींचे तातडीने निराकरण करावे. अशा सूचना मा. विभागीय आयुक्तांनी दिल्या.

1 सांडपाण्यावर प्रक्रिया करुन सांडपाण्याचा वापर बगीचे, झाडे सुशोभीकरणासाठी करता येतो किंवा कसे ते पहावे अशा सूचना महानगरपालिका व पर्यावरणाशी संबंधित विभागास मा. विभागीय आयुक्तांनी दिल्या. यासाठी स्मार्ट सिटी आराखडयात नियोजन करण्यात येत असल्याचे महापालीकेच्या अधिका-यांनी सांगितले.

2. गोदावरी नदी पात्रातील जुने पाण्याचे स्त्रोत शोधून ते जिवंत करण्यासाठी महानगर पालिकेने पर्यावरण विभाग व महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांच्या मदतीने अभ्यास करुन योग्य कार्यवाही करावी. तसेच जिवंत स्त्रोत व नदीतील पाणी नमुने जिल्हा परिषदेने तपासणी करावी अशा सूचना मा. विभागीय आयुक्तांनी दिल्या.

3. जिल्हापरिषद, गोदावरी संवर्धनाचा प्रचार व प्रसार करणे, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ या उपसमित्यांनी बैठक घेवून इतिवृत्त या कार्यालयास सादर करावे.

4. मा. उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार न्यायालयात सादर करावयाचा सविस्तर अहवाल 15 जुन 2019 पर्यंत सर्व विभागांनी सादर करावा.

जनहित याचिका क्र. 176/ 2012 गोदावरी प्रदुषणाबाबत काम प्रभावीरित्या होण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने आवश्यक कार्यवाही वेळेत करावी असे निर्देश मा. विभागीय आयुक्तांनी देवून बैठकीचा समारोप करण्यात आला.

स्वाक्षरीत
( राजाराम माने )
विभागीय आयुक्त
नाशिक विभाग, नाशिक.

क्र.कक्ष-15/कशु-1/बैइतिवृत्त- 2019/
दि. /06/2019.

( राजाराम माने )
विभागीय आयुक्त
नाशिक विभाग, नाशिक.